# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८१ /२०२५ दि. २३/०४/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे घोडबंदर राज्य मार्ग ८४ या रस्त्यावरील गायमुख घाटामधील ठाणे कडुन घोडबंदरला जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सी.जी.बी.एम. व सी.बी. पध्दतीने दिनांक २६/०४/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ वा. पासुन ते दिनांक २९/०४/२०२५ रोजी रात्रौ ११:५५ वा. पावेतो करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील प्रमाणे **वाहतुकीत बदल** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**अ) ठाणे घोडबंदर वाहीनी**

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** मुबई, ठाणे कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **वाय जंक्शन व कापुरबावडी जक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** मुबई, ठाणे कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहने ही वाय जंक्शन येथुन सरळ नाशिक रोडने खारेगाव टोलनाका मानकोली, अंजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.<br>**ब)** मुबई, ठाणे कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहने ही कापुरबावडी जक्शन जवळुन उजवी कडे वळण घेउन कशेळी,अजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** मुंब्रा ,कळवा कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **खारेगाव टोल नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | मुंब्रा, कळवा कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व वाहने खारेगाव खाडी ब्रिजखालुन ,खारेगाव टोलनाका, मानकोली, अजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** नाशिक कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारे सर्व जड अवजड वाहनांना **मानकोली नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | नाशिक कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाणरे सर्व जड अवजड वाहने ही मानकोली ब्रिज खालुन, उजवी कडे वळण घेउन अजुरफाटा मार्गे इच्छित स्थळी जातील. |

**ब) घोडबंदर ठाणे वाहीनी**

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** गुजरात कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.<br>**२)** मुबई, विरार वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व जड अवजड वाहनांना **फाऊटंन हॉटेल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | गुजरात, मुबई, विरार वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व जड ,अवजड वाहने ही **चिंचोटी नाका येथुन कामण, अंजुर फाटा, माणकोली भिंवडी** मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक २६/०४/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ वा. पासुन ते दिनांक २९/०४/२०२५ रोजी रात्रौ ११:५५ वा. पावेतो पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत मा. सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.

अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.

अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.

पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — १ ठाणे, परिमंडळ — २ भिवंडी, परिमंडळ — ३ कल्याण,
परिमंडळ — ४ उल्हासनगर, परिमंडळ — ५ वागळे इस्टेट.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

**प्रत** :— आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :— मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/— सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कासारवडवली, कापूरबावडी, कळवा, नारपोली, भिवंडी, मुंब्रा, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर

**प्रत** :— सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner